वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि.७ ऑक्टोंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# दोन दिवसाचा आनंद-आनंदच राहिला

## सुप्रीम कोर्टाच्या दणक्याने अनेकांची स्वप्ने भंगली

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

### प्रभाग रचना आरक्षणाचा निर्णय फिरविला, १९९६ च्या नियमानुसारच होणार लागू

### जाहिर झालेले आरक्षण रद्द होणार, नव्याने आरक्षण जाहिर होणार

बीड, (दिव्य न्युज):- आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभाग रचनेतील आरक्षणाबाबतचे नियम राज्य शासनाने बदलले आहेत. याविरोधात दाखल विविध याचिका फेटाळून लावत सुप्रीम कोर्टानं बारा दिवसांपूर्वीच २५ सप्टेंबर २०२५ रोजी शासनाच्या नियमात हस्तक्षेपास नकार दिला होता. हस्तक्षेप केल्यास निवडणुका आणखी लांबतील असं कारण त्यावेळी सुप्रीम कोर्टानं दिलं होतं. पण आज ७ ऑक्टोबर २०२५ रोजी सुप्रीम कोर्टानं आपला हाच आदेश फिरवत आता १९९६ च्या नियमानुसारच आरक्षण लागू राहिल असा आदेश दिला आहे. यामुळं आता निवडणूक आयोगानं नुकत्याच जाहीर केलेल्या आरक्षणांमध्ये पुन्हा नव्यानं बदल होणार आहेत.

२५ सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीत सुप्रीम कोर्टानं निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेपास नकार दिला होता. प्रभाग रचनेसाठी एसएसी, एसटी आणि ओबीसींसाठी ▶▶ पान २ वर

#### काय आहे १९९६ चा नियम?

१९९६ मध्ये महाराष्ट्र शासनानं स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणासाठी चक्रानुक्रमाचा नियम लागू केला होता.त्यात - पहिल्या निवडणुकीत काही प्रभाग एससी,एसटी, ओबीसी साठी आरक्षित होतात,पुढील निवडणुकीत हे आरक्षण पुढील प्रभागांकडे सरकवलं जातं, आणि संपूर्ण प्रभाग पूर्ण होईपर्यंत हे चक्र फिरत राहतं.ही पद्धत १९९७, २००२, २००७, २०१२ आणि २०१७ या पाच निवडणुकांमध्ये वापरण्यात आली होती.हायकोर्टानंही लोकसंख्येचं गुणोत्तर बदललं तरी चक्रानुक्रम मोडता येणार नाही असा निर्णय प्रशांत बंब विरुद्ध महाराष्ट्र शासन आणि उदय खंडेराव पवार विरुद्ध महाराष्ट्र शासन या खटल्यांमध्ये दिला होता.

#### राज्य शासनाचा तर्क

राज्य शासनानं या वेळी मांडलेला तर्क असा होता की, १९९६ पासून पाच टप्प्यांत चक्राकार आरक्षण पूर्ण झालं आहे. म्हणून आता पुढील निवडणूक ही नवी पहिली निवडणूक मानून आरक्षण पुन्हा सुरुवातीपासून सुरू करावं. हा निर्णय अनेक ठिकाणी राजकीय गणितं बदलणारा ठरणार होता.मात्र, सर्वोच्च न्यायालयानं या युक्तिवादाला मान्यता दिली नाही.

#### आता पुढे काय?

या निर्णयानंतर राज्य निवडणूक आयोगाला पुन्हा नव्यानं आरक्षण सोडत काढावी लागेल. ज्या प्रभागांसाठी आरक्षण आधी जाहीर झालं होतं, त्यामध्ये बदल होतील. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम थोडा पुढे ढकलला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# दहा गुंठे जागेसाठी नगरपालिका, भूमि अभिरवेलकडून छळ

## पाच वर्षापासून डॉ.मनोज लांडगे यांना काढतात वेड्यात

### बांधकाम परवाण्याचे काम करून देण्यासाठी अधिकारी, नेते आणि दलालांनी ८० लाखाला लुटले

बीड , (दिव्य न्युज):- एखाद्याची सत्याची बाजू असतानाही नगरपालिका आणि भूमी अभिलेख कार्यालय बीड तालुका आणि जिल्हा कार्यालय येथील अधिकारी आणि कर्मचारी यांनी कागदोपत्री खुट्या मारून याच यंत्रणेने पाळलेल्या दलालांना पुढे करून ८० लाख रुपये उकळण्याचा धक्कादायक प्रकार बीड मधील डॉक्टर मनोज लांडगे यांच्या बाबतीत घडला आहे. अधिकारी कर्मचारी आणि दलाल पैशासाठी एखाद्याचा किती छळ करू शकतात हे यावरून दिसते तर सर्व सामान्याचे तर विचारायचेच नको.केवळ बांधकाम परवान्यासाठी जर एखाद्याचा एवढा छळ आणि लाखो रुपयांची लूट होत असेल तर बीडचे पालकमंत्री अजितदादा यांनी अशा भ्रष्टाचारी अधिकारी कर्मचारी आणि त्यांनी पाळलेल्या दलालांना धडा शिकवावा, तसेच माझ्याकडून लाखो रुपये उकळणाऱ्या अधिकारी कर्मचारी नेते आणि या यंत्रणांनी पाळलेले दलाल यांच्या फोन कॉल रेकॉर्डिंग विविध पुरावे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना देणार असल्याचे डॉक्टर मनोज लांडगे यांनी सांगितले. यामुळे आता अनेक अधिकारी त्यांनी पाळलेले दलाल अनेकांची नावे समोर येणार असून मोठी खळबळ उडणार आहे. अत्यंत शिस्तप्रिय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे बीड चे पालकमंत्री आहेत. मात्र दादांची सुद्धा नगरपरिषद बीड व तालुका भूमी अभिलेख बीड या कार्यालयाला भीती राहिली नाही. ▶▶ पान २ वर

### अधिकारी आणि दलालांच्या कॉल रेकॉर्डिंग, पुरावे अजित दादा आणि एसीबीला देणार-डॉ.मनोज लांडगे

नगरपालिकेतील अधिकारी कर्मचारी आणि भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी कर्मचारी सुरुवातीचा हेच लोक अडचणी निर्माण करतात आणि मग यांच्या रॅकेट द्वारे आर्थिक तडजोड करून प्रश्न सोडवायचा या निर्दयी लोकांनी इमान तर सोडलाच पण यांची आत्म सुद्धा मेलेली आहे.

पैसा घेऊन सुद्धा हे लोक काम करत नाहीत केले तर अर्धवट करतात आणि परत एका नवीन भ्रष्टाचाराची सुरुवात होते. डॉक्टर मनोज सुधीर लांडगे यांच्याकडून लाखो रुपये नगरपरिषद कार्यालय बीड तालुका व जिल्हा भूमी अभिलेख बीड यांनी उकळले असून या संबंधित अधिकारी कर्मचारी आणि काही दलाल यांच्या कॉल रेकॉर्डिंग वाईस रेकॉर्डिंग डॉक्टर मनोज लांडगे यांच्याकडे उपलब्ध आहेत लवकरच डॉक्टर मनोज



लांडगे या भ्रष्टाचारातील समावेश असलेल्या अधिकाऱ्यांच्या आणि दलाल यांच्या नावे एसीबी तसेच पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्द करणार आहेत डॉक्टर मनोज लांडगे यांना एक दिवस न्याय मिळेलच पण बाकी सामान्य जनतेने नगरपरिषद बीड व तालुका भूमि ▶▶ पान २ वर

# २ सप्टेंबरचा जीआर रद्द होणार नाही

### हायकोर्टाने हैदराबाद गॅझेटियरसंदर्भातील याचिका फेटाळल्या

मुंबई, (दिव्य न्युज):- मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मुंबईत मराठा समाजाचे आरक्षणाच्या मागणीसाठी मोठे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे फलित म्हणजे शासनाने हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार, हैदराबाद गॅझेटिरयच्या आधारे कुणबी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यात आलं आहे. मात्र, या निर्णयाला ओबीसी नेत्यांनी, संघटनांनी विरोध करत न्यायालयात धाव घेतली होती.



मात्र, २ सप्टेंबरच्या शासन निर्णयाला अंतरिम स्थगिती देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने नकार दिल्याने मराठा समाजाला मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच, राज्य सरकारने केलेल्या युक्तिवादानंतर उच्च न्यायालयाने हैदराबाद गॅझेटियरच्या शासन आदेशाला स्थगिती देण्यास नकार दिल्यामुळे राज्य सरकारला देखील मोठा दिलासा मिळाला आहे. हायकोर्टाचे मुख्य न्या. चंद्रशेखर आणि न्या. ▶▶ पान २ वर





# धनगर आरक्षणासाठी आत्महत्या

## मृतदेह गेवराई तहसिलसमोर आणून ठेवला

गेवराई , (दिव्य न्युज):- धनगर समाजाचा एसटी आरक्षणात समावेश करा या मागणीसाठी गेवराईतील एका मजुराने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना आज पहाटे संतोष नगर मोंढा नाका भागात घडली. मयताच्या खिश्यात चिठ्ठी आढळली असून धनगर समाजाला आरक्षण मिळत नसल्याने हे पाऊल उचलत असल्याचे त्यामध्ये नमुद केले आहे. दरम्यान सदरील घटनेनंतर संतप्त समाज बांधवांनी मृतदेह गेवराई तहसील कार्यालयासमोर आणून ठेवला. मृतदेहासह समाजबांधवांनी तब्बल अर्धा तास ठिय्या आंदोलन केले. तहसीलदारांनी निवेदन स्विकारल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला. गेवराई शहरातील संतोष नगर मोंढा नाका भागातील ज्ञानदेव नामदेव कोल्हे (वय ४४) यांनी आज पहाटे २ वाजण्याच्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली. कोल्हे यांच्या खिश्यामध्ये चिठ्ठी आढळून आली आहे. आत्महत्येची माहिती मिळताच पोलीसांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पान २ वर






# डॉ.योगेश क्षीरसागरांनी घेतली अजित पवारांची भेट

### कपिलधारवाडी, हिंगणी खुर्दचे पुनर्वसन होणार, डीपी रस्त्यांसाठी निधी मिळणार

बीड , (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांची सोमवारी (दि.६) भेट घेऊन विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली. यावेळी बीड व शिरूर कासार तालुक्यातील आपत्तीग्रस्त भागांचे पुनर्वसन, विकास प्रकल्प आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी अजितदादांनी मार्गदर्शन केले असून पूर्ण ताकदीने निवडणुका लढविल्या जाणार आहेत. ▶▶ पान २ वर



# मुंबईहुन आलेल्या अधिकाऱ्याला थेट एलसीबीमध्ये मिळाली संधी

### कामगिरीऐवजी पुन्हा वशिलेबाजीचा फंडा सुरु झाल्याची पोलिसांत चर्चा

बीड , (दिव्य न्युज):- पोलीस दलात महत्वाची शाखा म्हणून स्थानिक गुन्हे शाखेकडे पाहिले जाते. मात्र येथील नियुक्त्यांवर पुन्हा एकदा संशय निर्माण होऊ लागला आहे. कारण गुन्हे उघडकीस आणण्यात कुशल, जिल्ह्याची भौगोलिक व गुन्हेगारी पार्श्वभूमी माहिती असलेल्या अधिकाऱ्यांनाच येथे संधी दिली जाईल, असे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी स्पष्ट केले होते. मात्र, प्रत्यक्षात या नियुक्त्या देतांना मनमानी आणि ▶▶ पान २ वर

#### 'काम दाखवा, नियुक्ती मिळवा' केवळ दाखवण्यासाठीच का ?


एसपी नवनीत काँवत यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात तब्बल ६५० कर्मचाऱ्यांच्या बदल्या पारदर्शक पद्धतीने झाल्याने त्यांचे कौतुक झाले होते. पुढाऱ्यांच्या शिफारसींना न जुमानता त्यांनी ▶▶ पान २ वर

# उठले की हॉस्पिटल, सुटले की पुन्हा हॉस्पिटल

## पिऊन पिऊन किडनी खराब ; मनोज जरांगेंवर भुजबळांचा आरोप

नाशिक, (दिव्य न्युज):- मुंबईतील आझाद मैदानावर ओबीसी समाजाच्या आंदोलनादरम्यान राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी राज्य सरकार आणि पोलिसांना थेट इशारा दिला आहे. कायदा हातात घ्यायला अक्कल लागत नाही, पण जिथे अन्याय होतो, तिथे कारवाई झालीच पाहिजे. आम्ही संविधानाच्या मार्गाने जात आहोत. मात्र आमची डोकी फुटली, तर पुढील जबाबदारी शासन आणि पोलिसांची राहील, असे भुजबळ यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

शिवा संघटनेच्या वतीने आझाद मैदानात सुरू असलेले उपोषण हे २ सप्टेंबर रोजी राज्य सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात काढलेल्या जीआरविरोधात आहे. या जीआरला रद्द करण्याची मागणी आंदोलकांनी केली आहे. भुजबळ म्हणाले, एक चुकीचा जीआर काढला गेला, जो



मला दाखवला सुद्धा गेला नाही. काही तथाकथित मराठा नेते असे समजतात की महाराष्ट्र आणि मराठा समाज त्यांच्या दावणीला बांधला आहे. ते नेहमी उपोषणाला बसतात उठले की हॉस्पिटल, सुटले की पुन्हा हॉस्पिटल. किडन्या खराब झाल्या पिऊन पिऊन जे काही बोलायचं ते बोलतात. असा जोरदार हल्लाबोल मनोज जरांगे यांच्यावर केला.

त्यांनी पुढे म्हटलं, त्या दिवशी पोलिसांना कोणी ऐकले नाही. रस्त्यावर नाचत होते, अंघोळ करत होते. ही मुंबई आहे! मी दोन वेळा या ठिकाणी महापौर झालो, आमदार झालो, पण अशी परिस्थिती कधी पाहिली नाही. मुंबईतून जो नारा उठतो तो देशभर ऐकला जातो.तो जीआर टिकणार नाही, हा माझा ठाम विश्वास आहे. लाखे पाटील यांनी सांगितले की, आधी ठरवतात काय द्यायचं आणि मग उपोषणाला बसतात. एका तासात जीआर बदलतात, पात्र हा शब्द काढतात. मुख्यमंत्री आणि मंत्र्यांसोबत ही कुठली पद्धत? मी १९९१ मध्ये महसूल मंत्री होतो, पण असे कधीच घडलं नाही.

भुजबळ पुढे म्हणाले, मला नेता बाळासाहेब ठाकरे यांनी केलं. पहिले १० शाखाप्रमुखांमध्ये मी होतो. मंडळ आयोगावरून आमचं मतभेद झालं, पण तो मराठा नेता अजून शिकलेला नाही. कोणालाही शिवी देतो, कोर्टाने काही फेटाळलेलं नाही, फक्त सर्व बाजू ऐकून घेत आहेत.पुढे ते म्हणाले, आज शेतकऱ्यांना सरकारने मोठी मदत दिली, अशी मदत मी कधीच पाहिली नाही. आपण ओबीसी म्हणून एकत्र राहायला हवं. तो जीआर रद्द करणे हेच आपलं उद्दिष्ट आहे. असे छगन भुजबळ म्हणाले.

पान ४ वरून

### प्राथमिक शिक्षकांवर

संघटनांनी व्यक्त केली असून, प्रशासनाने यावर निर्बंध घालण्याची मागणी केली आहे.

प्राथमिक शाळांमध्ये सध्या असा प्रवास चालू आहे की, सकाळी शाळेत वर्ग सुरू करायला गेलो तरी व्हॉट्सपवर नवी लिंक धडकते. ती लगेच भरली नाही तर वरून फोन येतो. विद्यार्थी वर्गात बसलेले, पण शिक्षक मात्र स्क्रीनवर अडकलेले. सकाळची एक मागणी पूर्ण केली की दुपारी नवी मागणी. महिन्यातील १७-१८ दिवस असे आकस्मिक आदेश व्हॉट्सपद्वारे धडकविले जातात. यात झेरॉक्स, यादी, अहवाल यांचा समावेश असतो, ज्यामुळे वर्गात शिकविण्यासाठी वेळच उरत नाही, असा आरोप शिक्षकांनी केला आहे.

### वक्फ मंडळाची जमीन

मागण्या आणि कारवाई : सय्यद फेरोज यांनी पुढील कारवाईसाठी मागणी केली आहे:

बेकायदेशीर फेरफार नोंदी तात्काळ रद्द कराव्यात.

सय्यद बाबामियां करीमोउद्दीन इनामदार व त्यांचे मुलांवर वक्फ कायद्यानुसार फौजदारी गुन्हे दाखल करावेत.

महसूल अधिकाऱ्यांची चौकशी करून शिस्तभंगात्मक कारवाई करावी. सदर जमीन कायमस्वरूपी वक्फ मंडळाच्या ताब्यात राहील याची खात्री करावी.

जनतेत संताप, आंदोलनाचा इशारा

या प्रकारामुळे वक्फ मालमत्तांच्या रक्षणाबाबत महसूल प्रशासन व वक्फ मंडळाची जबाबदारी अधोरेखित झाली आहे. दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलनाचा इशारा सय्यद फेरोज यांनी दिला आहे .

### वडवणी तालुका सरपंच

शेंडगे तर उपाध्यक्षपदी रुई गावचे विकासाभिमुख सरपंच मयूर भैया आंधळे तसेच खळवट लिमगावचे सरपंच गणेशराव अंबुरे व सचिवपदी केंडेपिंपरी धानोरा गावचे सरपंच संजय धपाटे यासह सदस यांच्या बिनविरोध निवडी झालेले आहेत तरी नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### १००-१५० प्रकारची

ज्यामुळे अध्यापनावर परिणाम होतो. पुरंदर तालुका प्राथमिक शिक्षक समन्वय समितीचे अध्यक्ष दत्तात्रय गायकवाड म्हणाले, वर्गात मुलं बसलेली असतात, आम्हाला मात्र मोबाईलवर माहिती भरावी लागते. नाहीतर लगेच व्हॉट्सपवर माहिती भरण्यासाठी मेसेज येतो. यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होतेय. तर पुरंदर तालुका शिक्षक समितीचे अध्यक्ष सुनील कुंजीर यांनी नमूद केले की, एखाद्या दिवशी सकाळी माहिती दिली तर दुपारी नवी मागणी. शिकवण्यापेक्षा कागदपत्रे आणि लिंक भरण्यातच शिक्षक व मुख्याध्यापकांचा बहुतांश वेळ जातो.

पान १ वरून

### दोन दिवसाचा

चक्रानुक्रमानं आरक्षण दिलं जातं. तर ओबीसींना लॉट्सचे ड्रॉ काढून आरक्षण दिलं जातं. याबाबत राज्यघटनेतील कलम २४३ डी नुसार चक्रानुक्रमानं अर्थात आळीपाळीनं प्रभाग आरक्षित व्हावेत अशी तरतूद आहे. यामध्ये एससी आणि एसटीचे आरक्षित प्रभाग पहिल्या निवडणुकीत निश्चित होतात. त्यानंतर पुढच्या निवडणुकीत पुढचे प्रभाग निश्चित होतात, अशा प्रकारे संपूर्ण प्रभाग पूर्ण होईपर्यंत हे आरक्षण चक्राकार पद्धीतीनं फिरवलं जात असतं. त्याचप्रमाणे एसटी प्रवर्गाचंही आरक्षण फिरवलं जातं, तसंच ओबीसींचं देखील चक्राकार पद्धतीनं फिरवलं जातं.

दरम्यान, यासंदर्भात १९९६ मध्ये या पद्धतीचे नियम आले. त्यानंतर १९९७च्या निवडणुकीत पहिल्यांदा हे चक्राकार आरक्षण सुरु झालं, त्यानंतर २००२, २००७, २०१२, २०१७ अशा पाच निवडुकांमध्ये ही आरक्षणाची चक्राकार पद्धत पूर्ण झाली. दरम्यान, प्रशांत बंब विरुद्ध महाराष्ट्र शासन आणि उदय खंडेराव पवार विरुद्ध महाराष्ट्र शासन या दोन खटल्यांमध्ये हायकोर्टानं आदेश दिले होते की, हा चक्रानुक्रम प्रभागांमधील लोकसंख्येचं प्रमाण किंवा गुणोत्तर जरी बदललं तरी या चक्राकार नियमाचं पालन करावंच लागेल. त्यानुसार राज्य निवडणूक आयोग याचं पालन करत होतं.

पण यंदा राज्य शासनानं आरक्षणाची ही चक्राकर पद्धत पूर्ण झाली असल्यानं शून्य आरक्षणाचा नियम आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी लागू केला होता. आता प्रभाग रचना बदलली असल्याचं सांगताना यापुढची निवडणूक म्हणजेच आगामी निवडणूक ही पहिली निवडणूक समजण्यात येईल, असं शासनानं नव्या नियमात म्हटलं होतं. त्यामुळं या चक्राकार आरक्षणाच्या नियमाला काहीसा ब्रेक लागला होता. आगामी निवडणूक पहिली निवडणूक समजण्यात येणार असल्यानं आधीचे जे प्रभाग आरक्षित होते ते परत आरक्षित होणार होते.

तिन्ही खंडपीठात याचिका दाखल

तसंच ज्यांना आपले प्रभाग आरक्षित होतील अपेक्षा होती ते होणार नव्हते. त्यामुळं राज्य शासनाच्या या नव्या बदलला स्थगिती देण्यात यावी या मुद्द्यावरुन नागपूर खंडपीठ, औरंगाबाद खंडपीठ आणि मुंबई हायकोर्टात याचिका दाखल झाल्या होत्या. यामध्ये नागपूर खंडपीठानं १९ सप्टेंबरला निकाल देऊन या याचिका फेटाळून लावल्या होत्या. याच निकालाविरोधात सुप्रीम कोर्टात दाखल झालेल्या अपिल याचिकेवर २५ सप्टेंबर २०२५ रोजी सुनावणी झाली. या याचिकेनुसार, राज्य शासनाच्या या बदलामुळं राज्यघटनेनं जो नियम घालून दिला आहे, चक्रानुक्रमानं निवडणूक घेण्याच्या नियमाचा भंग होईल. तसंच राज्य शासन यानंतरही हा नियम तोडू शकतं, त्यामुळं राज्य शासनाचा हा नवा नियम असंविधानिक आहे. त्यामुळं बाकीची प्रक्रिया ही नव्या नियमानुसार होऊ द्या पण आरक्षण हे चक्रानुक्रमानंच होऊ द्या अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली होती.

सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी

या निर्णयाविरोधात अपील सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलं.२५ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या पहिल्या सुनावणीत कोर्टानं निवडणुकीच्या प्रक्रियेत हस्तक्षेपास नकार दिला होता, कारण हस्तक्षेप केल्यास निवडणुका आणखी पुढे ढकलल्या जातील असं कोर्टानं म्हटलं होतं.मात्र आज, ७ ऑक्टोबर रोजी झालेल्या अंतिम सुनावणीत, कोर्टानं आपल्या आधीच्या निर्णयावर पुनर्विचार करत १९९६ च्या नियमांनुसारच आरक्षण लागू राहील असा स्पष्ट आदेश दिला.यामुळे राज्य शासनाचा ताजा निर्णय न्यायालयानं उलटवला आहे.

### अधिकारी आणि

अभिलेख बीड या कार्यालयामध्ये जाऊ नये असा सल्ला द्यावा लागेल असे डॉक्टर मनोज लांडगे यांनी सांगितले. नगरपरिषद बीड आणि भूमी अभिलेख कार्यालय तालुका जिल्हा आणि त्यांनी नेमलेल्या दलालांनी शेकडो व्यवसायिकांना लुटले आहे लाखो रुपयांचा भ्रष्टाचार करून हे लोक ताठ मानेने फिरतात. मी लाखो रुपयांचा टॅक्स सरकारला जमा करतो माझ्या ट्रॅकच्या पैशातूनच पगार मिळवणारे हे लोक मला माझ्याच नागरी हक्कापासून बंचित ठेवत आहेत. पालकमंत्री अजितदादा पवार आपणास एवढेच विनंती असल्या बेलगाम अधिकाऱ्यांना धडा शिकवा नाहीतर बीड जिल्ह्याची अजून बदनामी झाल्याशिवाय राहणार नाही. आतापर्यंत हजारो लोकांना या लोकांनी अशाच प्रकारे लुटले असावे माझ्या बांधकामाच्या ठिकाणी कोटिंग साठी खड्डा खोदला आहे जिथे मोठ्या प्रमाणात पाणी साठवून शेजारील इमारती व इतर लोकांच्या जीविकास धोका निर्माण झाला आहे या सर्व गोष्टींची आणि आवश्यक त्या प्रत्येक कागदपत्राची पूर्तताच आम्ही नगरपरिषद बीड यांना केली आहे माझा लढा फक्त बांधकामासाठी आहे पण नगर परिषदेने माझे आर्थिक पिळवणूक तर केलीत शिवाय या जागेवरील सत्तर लाख कर्जाचे बँकांकडून वसुली सुरू आहे माझा व्यावसायिक तोटा मानसिक त्रास यांना तर सीमाच नाही या सिस्टमला माझी एवढेच विनंती आहे की जर माझ्या समाजाला गरज नसेल तर मला इच्छाशक्ती मरणाची परवानगी द्यावी.

### दहा गुंठे जागेसाठी

नोंदणीकृत खरेदीखत करून खरेदी केलेल्या मिळकतीवर रितसर बांधकाम परवानगी घेऊन सुरू केलेल्या बांधकामाला नगरपरिषद बीड आदेश देते की, सदरील जागा ही आरक्षित आहे मुळातच जागेच्या आरक्षणाबाबत शहानिशा ही बांधकाम परवानगी देण्याअगोदर झालेले असते. सोबत आरक्षित जागेचे खरेदी विक्री व्यवहार सुद्धा होत नाहीत हा प्रसंग आहे बीड मधील डॉक्टर मनोज सुधीर लांडगे यांच्या मालकीच्या भूखंडाविषयी ज्याचा सर्वे नंबर ७४ (आ) असून लीं पे १०९८ आहे. व जास्त नगर परिषदेने पिटीआर पे. १-५-१५०९ व १५६६ असे दिले आहेत. संबंधित भूखंड दहा गुंठे असून पैकी उत्तरेकडील अर्ध्या क्षेत्राचे खरेदीखत नोव्हेंबर २०१९ मध्ये झाले व उर्वरित दक्षिणेकडील अर्ध्या क्षेत्राचे खरेदीखत सप्टेंबर २०२० मध्ये झाले जून २०२० मध्ये उत्तरेकडील अर्ध्या क्षेत्राला बांधकाम परवानगी मिळाल्यानंतर दक्षिणेकडील अर्धे क्षेत्र खरेदी करण्यात आले होते या दहा गुंठे क्षेत्राला लागून दक्षिणेस जिल्हा परिषदेची २२ गुंठे जागा आहे जे नगर परिषदेने कौटुंबिक न्यायालयाच्या आवासा करिता आरक्षित केलेली आहे. याच २२ गुंठे जागेला काही भूमाफियांनी बळकावण्याचा प्रयत्न केला असता ॲड. धांडे व सुरवसे यांनी माननीय जिल्हा न्यायालयास पत्र व्यवहार करून संबंधित घटना कळविली या पत्राची दखल घेऊन माननीय न्यायालयाने माननीय जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे कळवले माननीय जिल्हाधिकारी यांनी नगरपालिका व तालुका भूमि अभिलेख बीड यांच्याकडून अहवाल मागवला डिसेंबर २०२१ मध्ये नगर परिषदेने कसली ही सुनावणी न घेता डॉक्टर मनोज लांडगे यांच्या मालकीचे पीटीआर व बांधकाम परवाना रद्द केला मुळात जी कार्यवाही फक्त २२ गुंठे जागेसाठी असताना सुद्धा विनाकारण नगर परिषदेने कसले ही कारण न सांगता रद्द केले. डिसेंबर २०२१ मध्ये सुरू झालेले ही कार्यवाही ६ महिने लोटून गेले समजायला की ही कार्यवाही शेजारील २२ गुंठ्यासाठी असून डॉक्टर मनोज लांडगे यांच्या मालकीच्या १० गुंठे जागेचा याच्याशी काही संबंध नाही पूर्ण कागदपत्राद्वारे डॉक्टर मनोज लांडगे यांनी माननीय जिल्हाधिकारी बीड जिल्हा न्यायालय बीड यांना पत्रद्वारे कळविले यास माननीय जिल्हा न्यायालयाचे उत्तर मिळाले ची संबंधित जागेचा माननीय कार्यालयाशी संबंध नाही माननीय न्यायालयाच्या या पत्रा आधारे नगरपरिषद बीड यांनी जून २०२२ मध्ये रद्द केलेले पीटीआर व बांधकाम परवानगी पुनरस्थापित केली व बांधकामाला वाढू एक वर्षाची मुदत देऊन नव्याने बांधकाम परवानगी दिली. म्हणजे आतापर्यंत नगर परिषदेने दोन वेळा बांधकाम परवानगी दिली ही खात्री करूनच की डॉक्टर मनोज लांडगे यांचे दहा गुंठे क्षेत्र आरक्षित नाही. त्यानंतर जून २०२२ मध्ये रद्द केलेले पीटीआर व बांधकाम परवानगी पुनर स्थापित केली व एकत्रित बांधकामाला वाढीव एक वर्षाची मुदत देऊन नव्याने बांधकाम परवानगी दिली म्हणजे आतापर्यंत नगरपरिषदेने दोन वेळा बांधकाम परवानगी दिली ही खात्री करूनच की डॉक्टर मनोज लांडगे यांचे दहा गुंठे क्षेत्र आरक्षण नाही त्यानंतर जून २०२२ मध्ये बांधकाम परवानगी मिळाल्यानंतर या जागेवर बांधकामासाठी २.४ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर झाले पैकी ७० लाखांचे कर्ज वितरित झाले असून कर्जाचा भरणाही चालू आहे कोणतीही बँक बांधकाम कर्ज देत असताना प्रॉपर्टी सर्च रिपोर्ट चेक केल्याशिवाय देत नाही जागा आरक्षित असती तर बँकेने कर्ज दिले नसते. पुढे सप्टेंबर २०२२ प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात झाल्यानंतर एका इसमाने या बांधकामा विरोधात खोडसाळपणाने नगरपालिकडे अर्ज केला की सदरील बांधकाम हे आरक्षित जागेवर असून ते तात्काळ बंद करावे सदरील व्यक्तीचा या सर्वे नंबरसी कसलाही संबंध नसताना या व्यक्तीचा अर्ज ग्राह्य धरून नगरपरिषदने तत्परतेने बांधकाम परवानगीला तात्पुरती स्थगिती दिली व डिसेंबर २०२२ मध्ये सुनावण्यांना सुरुवात केली. मुळातच या दहा गुंठे क्षेत्राला कधीच आरक्षित केले नसल्याचे सुनावणी मध्ये निष्पन्न झाले पण येथे एन्ट्री होत्या दुसऱ्या खलनायक कार्यालयाची तालुका भूमि अभिलेख विभाग बीड. याच विभागाने भूमाफियांशी हात मिळवणी करून शेजारील २२ गुंठे जागा भूमाफीयांच्या खिशात घालण्याचा प्रयत्न केला होता त्याच कार्यालयाने डॉक्टर मनोज लांडगे यांच्या दहा गुंठे क्षेत्राची कार्यवाही जिल्हा भूमी अभिलेख यांच्याकडे प्रस्तावित केली पण पुढे प्रस्ताव जिल्हा भूमी अभिलेख बीड यांना पाठवलाच नाही मग नगरपरिषद यांनी पुनर्विलोकन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच बांधकाम परवानगी विषयी निर्णय घेऊ असे पत्राद्वारे कळवले डिसेंबर २०२२ चा काळ मे २०२३ झाला जेव्हा पुनर्विलोकन अहवाल प्राप्त झाला यामध्ये डॉक्टर मनोज लांडगे यांच्या बाजूने निकाल लागला.

एवढा त्रास दिल्यानंतर अपेक्षित होते की नगरपालिका थोडी तरी तत्परता दाखवून बांधकाम परवानगी पुन्हा स्थापित करेल उलट नगरपरिषद बीड यांनी आणखीन त्रास द्यायला २२ गुंठे आरक्षित क्षेत्र व दहा गुंठे डॉक्टर लांडगे यांचे क्षेत्र याची एकत्रित मोजणी करण्यास तोंडी सांगू लागले मुळात २२ गुंठे जागा ही जिल्हा परिषदेची असून डॉक्टर मनोज लांडगे यांना एकत्रित मोजणी करणे शक्यच होऊ नये हा नगरपालिकेचा उद्देश होता एकत्रित मोजणी करण्याचे पत्र नगरपालिकेने तीन महिने उलटल्यानंतर सप्टेंबर २०२३ मध्ये दिले. वरील पत्र घेऊन तालुका भूमी अभिलेख बीड यांना एकत्रित मोजण्याचा अर्ज केला असता तालुका भूमि अभिलेख बीड यांनी एकत्रित मोजणी करता येणार नाही कारण या दोन्ही क्षेत्राची वेगवेगळी मोजणी अगोदरच झाली आहे असे कळविले तालुका भूमी अभिलेख बीड यांचे पत्र नगर परिषद बीड यांना सादर केले असता नगर परिषदेने अजून खोडा घालण्यात प्रयत्न केले शेवटी जेव्हा आर्थिक तडजोड केली तेव्हा सुनावण्यास नगर परिषदेने सुरुवात केली असल्याचे डॉक्टर मनोज लांडगे यांनी म्हटले. सुनावण्यामध्ये कसली कारवाई न करता अंतिम निर्णय ॲड भंडारी यांच्या आधारित दिला हे २०२४ मध्ये दिलेल्या या आदेशामध्ये डॉक्टर मनोज लांडगे यांना दक्षिणेकडील पंधरा मीटर क्षेत्रात बांधकाम न करण्याचे कळविले कोणत्याही लीगल ओपिनियन कायदेविषयक अभिप्रायाची व्याप्ती एवढी आहे का त्यामध्ये ॲक्युरेट मोजणी करून १५ मीटर सोडायला सांगितले जाऊ शकते तसे असतं तर भूमी अभिलेख विभागात वकिलांनाही भरती करायला हवे जे लीगल ओपिनियन केलं गेलं त्याचे कसलेही पुरावे डॉक्टर लांडगे यांना दिले गेले नाहीत आणि जर जागाच आरक्षित नाही तर पंधरा मीटर क्षेत्र सोडून बांधकाम का करावे हा प्रश्न या ठिकाणी निर्माण होतो एवढ्या सर्व बाईट अनुभवांचा सामना केल्यानंतर मार्च २०२४ मध्ये नगरपरिषदेच्या या अन्याय विरोधात डॉक्टर मनोज लांडगे यांनी उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांच्याकडे धाव घेतली असता गायक १७ तारखा झाल्या असून नगरपरिषद बीड यांनी खोडसाळपणे कसलेही म्हणणे न्यायालयासमोर सादर केले नाही वारंवार तारकापुढे ढकलून वेळ काढूपणाच केला आहे शिवाय न्यायदानाच्या पवित्र कार्यामध्ये सुद्धा अडथळे निर्माण केले आहेत. डॉक्टर मनोज लांडगे यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये एकत्रित मोजणी करून घेतली यामध्ये सदरील दहा गुंठे क्षेत्र व आरक्षित २२ गुंठे क्षेत्र तंतोतंत जुळे आहे मग एडवोकेट भंडारी यांनी अशी कोणती मोजणी केली ज्यामध्ये १५ मीटर जागा सोडण्यात सांगितले तरी पूर्ण सिस्टम करप्ट आहे आणि या लोकांनी भ्रष्टाचाराच्या नवीन नवीन परिसिमा गाठल्या आहेत.

### धनगर आरक्षणासाठी

गेवराई उपजिल्हा रूग्णालयात दाखल केला. मात्र आरक्षणाच्या मागणीसाठी आत्महत्येचे सत्र सुरू असूनही सरकार दखल घेत नसल्याने संतप्त धनगर समाज बांधव व नातेवाईकांनी मृतदेह गेवराई तहसील कार्यालयासमोर आणून ठिय्या मांडला. तहसीलदार खोमणे यांनी निवेदन स्विकारले असून धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी त्यांच्याकडे करण्यात आली. कोल्हे कुटूंबियांना सरकारने तात्काळ मदत न केल्यास तर आम्ही रस्त्यावर उतरू असा इशारा देखील समाजबांधवांनी दिला.

### २ सप्टेंबरचा

गौतम अंखड यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीला मान्यता देणाऱ्या शासन निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयास याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र, हायकोर्टाने या याचिका फेटाळून लावल्या आहेत. राज्यातील कुणबी सेना, महाराष्ट्र माळी समाज महासंघ, अहिर सुवर्णकार समाज संस्था, महाराष्ट्र नाभिक महामंडळ आणि सदानंद मंडलिक यांच्याकडून हैदराबाद गॅझेटिरविरुद्ध रीट याचिकांच्या माध्यमातून शासन निर्णयाला आव्हान देण्यात आलं होतं. या याचिकांसंदर्भात आज सुनावणी झाली, त्यावर २ सप्टेंबरचा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी फेटाळून लावली आहे. राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेला हैदराबाद गॅझेटियरचा शासन निर्णय असंवैधानिक असून तो रद्द करण्याची मागणी याचिकाकर्त्यांनी केली होती.

### ’काम दाखवा, नियुक्ती

कोणालाही विशेष वागणूक न दिल्याचे अनेकदा दिसून आले. मात्र, अलीकडील एलसीबीतील या नियुक्त्यांमुळे एसपींच्या पारदर्शकतेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ज्या अधिकाऱ्यांनी खरोखर कामगिरी दाखवली, त्यांना डावलून राजकीय आशीर्वाद लाभलेल्या अधिकार्यांना संधी मिळत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे ’काम दाखवा, नियुक्ती मिळवा’च्या उलट चित्र पोलीस दलात पहायला मिळत आहे.

### मुंबईहुन आलेल्या

वशिलेबाजीच्या आधारावर झाल्याची चर्चा सध्या पोलीस वर्तुळात सुरु आहे. अलीकडेच मुंबईवरुन बीड जिल्ह्यात बदली होऊन आलेले अधिकारी धनंजय जारवाल यांची प्रथम परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात नियुक्ती करण्यात आली होती. परंतु काही दिवसांतच या नियुक्तीत अंशतःबदल करत त्यांना थेट स्थानिक गुन्हे शाखेत काम करण्याची संधी देण्यात आली.

या निर्णयामुळे पोलीस दलात आश्चर्य आणि असंतोष दोन्ही व्यक्त होत आहेत. कामगिरीच्या आधारे संधी देण्याचा दावा आणि प्रत्यक्षात वशिलेबाजीवर झालेली नियुक्ती असा आरोप चर्चेत आहे.

त्यांना जवळ पोस्टिंग हवी होती, इतर कुठलेही ठाणे मी त्यांना देऊ शकत नाही. साईड ब्रांचही फुल झाल्या आहेत. एलसीबीत एक जागा रिक्त होती, त्याठिकाणी इतर अधिकारी देऊन मी रिस्क घेऊ शकत नाही. त्यामुळे जारवाल यांना एलसीबीत नेमणूक दिली.

- नवनीत काँवत पोलीस अधीक्षक, बीड

### डॉ.योगेश क्षीरसागरांनी

बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथील भूस्खलनाच्या गंभीर परिस्थितीबाबत डॉ.क्षीरसागर यांनी अजितदादांचे लक्ष वेधले. त्या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांच्या पुनर्वसनासाठी तसेच त्यांना सुरक्षित ठिकाणी आश्रय देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली. यासंदर्भात पालकमंत्री अजितदादांनी प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या. हिंगणी खुर्द गावात पाणी शिरल्याने झालेल्या नुकसानीबाबतही चर्चा झाली. या भागातील पंचनामे, मदत व गाव पुनर्वसनाच्या उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, अशी मागणी डॉ.क्षीरसागर यांनी केली. तसेच बीड शहरातील डीपी रस्ते प्रकल्पालाही अजितदादा पवार यांनी सकारात्मकता दर्शवली. तसेच, अन्य रस्त्यांसाठी डीपीसीव्यतिरिक्त राज्य शासनाकडून अतिरिक्त निधी दिला जाणार आहे.

नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी ठोक तरतूद हेडमधून मिळणार साडेआठ कोटींचा निधी

बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी नगरविकास विभागाच्या ठोस तरतूद हेडमधून नाट्यगृह उभारण्यासाठी लवकरच साडेआठ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्याचा सकारात्मक निर्णय अजितदादांनी घेतल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.